**petty officer,** पेटी ऑफिसर (सा.) [Cr. P. C.-s. 132(3)(b)]
**phase,** *n.* 1. टप्पा (पु.) 2. अवस्था (स्त्री.)
**phased,** *adj.* अवस्थाकल्पित, अवस्थाबद्ध, टप्पाबंद
**phased programme,** टप्पाबंद कार्यक्रम (पु.)
**photograph,** *n.* छायाचित्र (न.)
*v. t. & i.* छायाचित्र काढणे
**photography,** *n.* छायाचित्रण (न.) [Ind. Evi. Act-s. 62-Expl. 2]
**photostat,** *n.* 1. लेखछायाचित्र (न.) 2. लेखछायाचित्रक (पु.)
**physical comfort,** शरीरस्वास्थ्य (न.) [Cr. P. C.-s. 133(1)(b)]
**physical features,** प्राकृतिक रचना (स्त्री.)
**physical ill-treatment,** शारीरिक छळ (पु.)
**physical incapacity,** शारीरिक अक्षमता (स्त्री.)
**physical injury,** शारीरिक इजा (स्त्री.), शारीरिक क्षति (स्त्री.)
**physical or mental condition,** शारीरिक वा मानसिक स्थिति (स्त्री.) [Cr. P. C.-s. 360(3)]
**physical possession,** वास्तविक कब्जा (पु.), प्रत्यक्ष कब्जा, (पु.), खास कब्जा (पु.)
**physical verification,** प्रत्यक्ष पडताळा (पु.)
**physical violence,** शारीरिक हिंसाचार (पु.)
**pickery,** *n.* (petty theft) भुरटी चोरी (स्त्री.), उचलेगिरी (स्त्री.)
**piece,** *n.* 1. खंड (पु.), तुकडा (पु.) 2. (a single article, a definite quantity as of cloth, paper etc.) नग (पु.)
**pieces of counterfeit coin,** नकली नाणी (न. अ. व.) [Ind. Evi. Act-s. 14-ill.(b)]
**piece work,** उक्ते काम (न.)
**pier,** *n.* (a jetty or wharf) धक्का (पु.)
**pilfer,** *v. t. & i.* भुरटी चोरी करणे, उचलेगिरी करणे
**pilferage,** *n.* भुरटी चोरी (स्त्री.), उचलेगिरी (स्त्री.)
**pilferer,** *n.* भुरटा चोर (सा.), उचल्या (सा.)
**pillage,** *n.* लूट (स्त्री.), लूटमार (स्त्री.)
**piracy,** *n.* चाचेगिरी (स्त्री.) [Const.-Seventh Sch.-List I-21]
**pirate,** *n.* चाचा (सा.)
**placard,** *n.* 1. मोठी जाहिरात (स्त्री.) 2. घोषणाफलक (पु.), घोषणापत्रक (न.) [Ind. Evi. Act-s. 62-expl. 2-ill.]
**place,** *n.* ठिकाण (न.), स्थान (न.), स्थळ (न.), जागा (स्त्री.)
*v.t.* 1. ठेवणे 2. (to assign rank to) प्रत ठरवणे, क्रमांक ठरवणे 3. (to locate) स्थान ठरवणे, स्थान देणे 4. (to invest) (बँक, पेढी इत्यादीत) ठेवणे, गुंतवणे
**place of abode,** वास्तव्यस्थळ (न.) [Ind. Suc. Act-s. 270]
**place of amusement,** मनोरंजन स्थान (न.)
**place of arrest,** अटकेचे ठिकाण (न.) [Const.-Art. 22(2)]
**place of birth,** जन्मस्थळ (न.), जन्मस्थान (न.) [Const.-Art.-15-m.n.]
**place of business,** धंद्याचे ठिकाण (न.)
**place of fixed residence,** स्थिर निवासाचे स्थळ (न.) [Nego. Inst. Act-s. 71]
**place of public entertainment** सार्वजनिक करमणूक स्थान (न.) [Const.-Art.-15(2)(a)]
**place of public resort,** सार्वजनिक राबत्याची जागा (स्त्री.) [Const.-Art.-15(2)(b)]
**place of residence,** राहण्याचे ठिकाण (न.) [Const.-Art.-361(4)], निवासस्थान (न.)
**place of safety,** सुरक्षित ठिकाण (न.), सुरक्षित स्थळ (न.)
**place of suing,** दावा लावण्याचे स्थळ (न.) [C. P. C.-s. 21]
**place of worship,** पूजास्थान (न.), उपासना स्थळ (न.)
**plaint,** *n.* वादपत्र (न.)
**plaintiff,** *n.* वादी (सा.)
**plaintiff decreeholder,** (a plaintiff in whose favour the suit has been decreed) हुकूमनामाधारकवादी (सा.) [C. P. C.-First Sch.-Appen. G-Form No. 2]
**plan,** *n.* 1. (a drawing, sketch etc. of any object, made by projection upon a flat surface) नकाशा (न.) [Ind. Evi. Act-s. 83] 2. योजना (स्त्री.), बेत (पु.), डाव (पु.)
**planned,** *adj.* योजनाबद्ध, नियोजित
**planning,** *n.* नियोजन (न.) [Const.-Sixth Sch. 6(2)]
**plate,** *n.* 1. ताट (न.), ताटली (स्त्री.), थाळी (स्त्री.), पत्रा (पु.) 2. मौल्यवान भांडे (न.) 3. मुद्रापट्ट (पु.) [I. P. C.-ss. 473 & 485] 4. (a prize as a cup or other piece of plate given to the winner in a contest) तबक (न.) [Ind. Con. Act-s. 30]
**plate and pot,** (a jail term) थाळीपाट (न.)
**plea,** *n.* 1. विनंती (स्त्री.) 2. (a pleading) म्हणणे (न.), तक्रार (स्त्री.) 3. (an excuse, a pretext) सबब (स्त्री.) 4. (a prisoner's or defendant's answer to a charge or claim) प्रतिकथन (न.)
**plead,** *v. t. & i.* 1. प्रतिकथन करणे, प्रतिवाद करणे 2. बाजू मांडणे, वकिली करणे [Const.-Art. 220] 3. आक्षेप मांडणे, तक्रार मांडणे
**pleader,** *n.* वकील (सा.) [Cr. P. C.-s.2(q)] , प्लीडर (सा.)
**plead guilty,** अपराधाची कबुली देणे [Cr. P. C.-s. 241], गुन्ह्याची कबुली देणे, आपण दोषी असल्याचे प्रतिकथन करणे
**pleading,** *n.* म्हणणे (न.), युक्तिवाद (पु.), पक्षकथन (न.)
**pleadings,** *n.pl.* वादप्रतिवाद (पु.)
**plead in answer,** उत्तरादाखल प्रतिकथन करणे
**plead not guilty,** अपराध नाकबूल करणे, गुन्हा नाकबूल करणे, आपण दोषी नसल्याचे प्रतिकथन करणे
**plea in abatement,** (a plea which without, disputing justice of plaintiff's claim, objects to place, mode or time of asserting it-Black) अवसान-आक्षेप (पु.), अवसान-तक्रार (स्त्री.)
**plea in bar,** (a plea which goes to defeat the plaintiff's action absolutely and entirely-Black) दावारोधक आक्षेप (पु.), दावारोधक तक्रार (स्त्री.)
**plea in discharge,** (one which admits that the plaintiff had a cause of action, but shows that it was discharged by some subsequent or collateral matter, as payment or accord or satisfaction-Black) फेडीचा आक्षेप (पु.), फेडीची तक्रार (स्त्री.)
**plea of alibi,** अन्यत्र उपस्थितीचे प्रतिकथन (न.), अलिबीचे प्रतिकथन (न.)
**plea of guilty,** गुन्ह्याची कबुली (स्त्री.), अपराधीपणाची कबुली (स्त्री.) [Cr. P. C.-s. 241-m.n.], दोषीपणाचे प्रतिकथन (न.)
**plea of justification,** समर्थनार्थ प्रतिकथन (न.)
**plea of release,** (one which admits the cause of action but sets forth a release subsequently executed by the party authorised to release the claim-Black) हक्कसोड प्रतिकथन (न.)